# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक ७ | मुंबई | जानेवारी, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**
*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


*संपादकीय*

## हृदयी धरा हा बोध खरा...

—सुहासिनी कीर्तिकर

मित्रहो, टोनी मार्टिन्स नावाच्या लेखकाने लिहीलेल्या दोन गोष्टी आज मी तुमच्याशी संवाद साधताना सांगणार आहे. त्या कदाचित तुम्हीही वाचल्या असतील; तुम्हाला माहिती असतील. पण त्या गोष्टी आपल्या नित्य जीवनात आपण नवीन वर्षाचा संकल्प म्हणून आचरणात आणल्याच पाहिजेत; हे मात्र नक्की. तर त्या गोष्टी अशा आहेत -

पहिली गोष्ट : एक तरुण होतकरू मुलगा आपल्या आयुष्याला कसं वळण लावायचं ते त्याच्या एका म्हाताऱ्या शेजाऱ्याकडून शिकला होता. त्या बळावर तो शिक्षण, व्यवसाय, संसार यात यशस्वी होत नव्या नव्या स्वप्नांचा पाठलाग करत राहिला. दूरवर गेला. त्यामुळे या शेजाऱ्याशी संपर्क ठेवणे त्याला पुढे जमलेच नाही. एक दिवस त्याच्या आईचा फोन आला. 'अरे, आपल्या शेजारचे ते बेलसरेकाका वारले. त्यांनी तुझी खूप आठवण काढली शेवटी शेवटी.' मुलाला खूप दाटून आलं. त्याला आठवला सगळा भूतकाळ. वडील वारल्यावर हे शेजारचे बेलसरेकाकाच पाठीशी उभे राहिले होते. त्यामुळेच तो शिकला, सवरला, यशस्वी ठरला. तो आईला म्हणाला, ''मी कसाही, उद्या येतोच बघ घरी.'' तसा तो घरी गेला, आईबरोबर शेजारीही गेला. या शेजारच्या घराशी त्याचं भावनिक नातं तयार झालं होतं. बेलसऱ्यांचे घर पूर्वीसारखेच होते. जस्सेच्या तस्से. या तरुणाचा भूतकाळ जीवंत करणारे. तेथे निरीक्षण करताना तो अचानक थांबला.

''आई, इथे एक बॉक्स होतं. ते आता नाहीसं झालंय.''

''कसलं बॉक्स?'' - आईनं विचारलं. ''अगं, काकांनी त्यात सर्वात मौल्यवान वस्तू ठेवली होती. चावी असायची त्याला. फक्त तेवढंच खोकं गायब झालंय.''

दुसऱ्या दिवशी आईचा निरोप घेऊन मुलगा परतला. मात्र हुरहूर सोबत घेऊन. त्या बॉक्समध्ये कोणती मौल्यवान गोष्ट होती? काकांनी कधीच सांगीतलं नाही. अन् आता कधी कळणारही नाही.

काही दिवसांनी कुरियरने एक पॅकेट मुलाला आलं. जुनंच वेस्टन असलेलं. पाठवणाऱ्याचा पत्ता होता- 'श्री. बेलसरे. शांतीसदन' घाईघाईने मुलानं वेष्टन उघडलं. आत 'तेच' बॉक्स. सोबत एक पत्र - 'माझ्या मरणानंतर हे खोकं जॉनला (म्हणजे या मुलाला) देण्यात यावं.' सोबत त्या खोक्याची मखमली पिशवीत असलेली चावीही होती. चावीने खोकं उघडलं. तर काय? त्यात एक खिशात ठेवायचं घड्याळ होतं. त्याबरोबर एक चिठ्ठी! - 'जॉन, माझ्या म्हातारपणात तू मला दिलेल्या वेळेबद्दल थँक्स!' - तुझा बेलसरे काका.

मुलाला, (जॉनला) चकीत व्हायला झालं. ''म्हणजे? त्यांच्यासाठी सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे मी? नव्हे; नव्हे. मी त्यांच्यासाठी काढलेला 'वेळ' होता?''

ते घड्याळ हातात धरून जॉन थिजल्यासारखा बसून राहिला... मग बऱ्याच वेळानं त्यानं आपल्या ऑफिसमध्ये कळवलं - ''माझ्या उद्या परवाच्या सगळ्याच्या सगळ्या अपॉईंटमेंटस् कॅन्सल करा... मला माझ्या फॅमिलीला 'वेळ' द्यायचाय.'

मित्रानो, कशी वाटली गोष्ट? याच लेखकाची आता दुसरी गोष्ट : गोष्टीचं नाव आहे - 'बाईंग टाईम.'

एक माणूस दिवसभर खर्डेघाशी करून थकून भागून खूप उशीरा घरी परतला.

त्याचा पाच वर्षांचा मुलगा त्याची वाट पहात जागाच होता. मुलानं बाप आल्याआल्या प्रश्न विचारायला सुरुवात केली.

''डॅड, एक प्रश्न विचारू तुम्हाला?''

''हं, बोल. काय आहे?''

''डॅड, तुम्हाला एक तासाला किती पैसे मिळतात हो?''

''हे पहा. ते तुझं काम नाही हं. पण असं विचारायचं कारण?'' - त्रासिक आवाजात बापानं विचारलं.

''मला कळायला हवं. प्लीज सांगा ना! एका तासाला तुम्ही किती पैसे कमावता?'' - मुलानं परत विचारलं.

''जर तुला माहीत असायलाच हवं, तर ऐक. मी तासाला वीस डॉलर कमावतो.''

''ओह!'' - तो मुलगा हिरमुसला होत म्हणाला, ''डॅड, तुम्ही मला दहा डॉलर उसने देऊ शकाल का?''

वडिलांचा पारा चढला. ''मी किती कमावतो ते तुला याचसाठी हवं होतं का? एक खेळणं विकत घ्यायचंय वाटतं. मूर्खा! सरळ खोलीत जा आणि गुपचूप झोप! एवढा कसा रे तू स्वार्थी? मी दिवसभर एवढं राब राब राबतो आणि तू? एका क्षुल्लक खेळण्यासाठी मला माझी तासाची कमाई विचारतोस?'' वडिलांनी त्याला मारण्यासाठी हात उगारला तसा मुलगा चूपचाप खोलीत जाऊन पलंगावर आडवा झाला.

थोड्या वेळाने राग शांत झाल्यावर वडिलांना पश्चात्ताप झाला. त्यांना वाटलं, कदाचित त्या पैशातून त्याला गरजेचं काहीतरी आणायचं असेल. ते मुलाच्या खोलीचं दार उघडून हळूच आत गेले.

''बाळा, झोपलास का?''

''नाही डॅड. जागाच आहे.''

''अरे! दिवसभर काम करून थकलो होतो रे! माझा राग, थकवा मी उगाच तुझ्यावर काढला. हे घे! तुला हवे होते ना दहा डॉलर?'' - पैसे देत बाप म्हणाला.

''थँक यू डॅड!'' - असं उत्साहानं उद्गारत तो टुणकन उडी मारून वडिलांजवळ आला. ते दहा डॉलर घेतले. आपल्या उशीखालून काही चुरगळलेले डॉलर काढून तो मोजू लागला.

''तुला माझ्याकडे पैसे मागायची काय गरज होती? तुझ्याकडे तर पैसे आहेत की रे!'' - बाप रागावत म्हणाला.

मुलानं उत्तर दिलं - ''कारण माझ्याकडे पैसे होते ते पुरेसे नव्हते. पण आता ते पूर्ण झालेत. हे घ्या डॅड, पुरे वीस डॉलर आहेत. मला तुमचा एक तास विकत द्याल?''

टोनी मार्टिन्सच्या या दोन गोष्टी. गोष्टी कसल्या? प्रभावी बोधकथाच. पहिल्या गोष्टीत म्हाताऱ्या माणसांना तरुणांनी वेळ देणं अमूल्य ठरलं आहे तर; दुसऱ्या गोष्टीत बाबांनी आपल्या छोट्याकरिता वेळ देणं दाखवलं आहे. गोष्टीत फक्त बाबाच आहेत. पण अलीकडच्या कुटुंब चौकटीत आई आणि बाबा - दोघंही सकाळपासून रात्रीबेरात्रीपर्यंत कमविण्यासाठी, 'करियर'साठी बाहेर असतात. मुलांनी त्यांचा 'वेळ' खरेदी करण्याची वेळ आलीय आजकाल. तो खरेदी करता येतोच असंही नाही. मग पाळणाघरं (की यातनाघरं?) क्लासेसचं शेपूट, कॉम्प्यूटर, टी.व्ही., नको ते खेळ वा 'टाइमपास'... सहवासाचा आनंद वाढवून निरोगी जगण्याचा मंत्रच हल्ली हरवत चाललाय. म्हाताऱ्यांना कुटुंबाचा हृद्य सहवास, मुलांना पालकांचा आनंददायी सहवास, हवाच हवा. तरच ते खऱ्या अर्थानं घर. 'नकोच नुसत्या भिंती'! मग एकलकोंडेपणा कमी होईल. एकमेकांना घडवणारा आनंद दिला, घेतला जाईल. शाळाकॉलेज, बाहेरचं जग - येथला ताण घराच्या उंबरठ्याबाहेरच थांबेल. आज वयाची चाळीशीही (या ताणापायी) दिमाखानं साजरी केली जाते. कारण तरुण वयातच मानसिक तणाव (स्ट्रेस) वाढतो. एकमेकांना द्यायला वेळच नाही मग घरपण राखणारा संवाद कुठला? कर्तव्यपालन करता करता जगणंच किंकर्तव्यमूढ होऊन जातंय. माणसांच असं जगण्याचं मशीन झालंय. केशवसुतांनी त्या... काळात बजावलं होतं की 'नियम मनुजासाठी, मानव न नियमासाठी'. आजच्या काळात हे ध्यानी घेतलंच पाहिजे की पैसा माणसासाठी आहे, माणूस पैशासाठी नाही. यंत्रे आपल्यासाठी आहेत, आपण यंत्रवत

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

वागून यंत्रासाठी नाही. घर म्हणजे नांदणे. 'नांदणे' म्हणजे सुखाने जगणे. 'नंदयति देवता सा नांदी।' अशी नांदीची व्याख्या आहे. घर म्हणजे अशी सुखाची नांदीच असली पाहिजे अन् जगणे म्हणजे दैवी आनंदाचा अनुभव.

या अनुभवासाठी निकोप 'वेळ' दिला पाहिजे. वेळेवर 'वेळ' दिला की सुखाची गाज आयुष्याच्या वेळेवर (पुळणीवर) ऐकू येत राहील. ही गाज ऐकायची तर जाग आली पाहिजे. जानेवारीपासून सुरू होणाऱ्या नवीन वर्षात आपल्या सर्वांच्या जगण्यात ही गाज ऐकू येत राहो! मनापासून 'वेळ' देऊन हे संपादकीय लिहीताना खात्री आहेच की तुम्हीही वर्षभर 'प्रभुतरुणा'ला आपला वेळ देत रहाल. तोही जगण्याचाच एक भाग आहे ना? तर जगणे समृद्ध होऊ द्यात. शुभेच्छा!

*

## सदाशिवराव गोरक्षकर यांना प्रतिष्ठेचा चतुरंग जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**-मृदुला प्रभुराम जोशी**

डोंबिवली येथील सावित्रीबाई फुले कला मंदिर या भव्य सभागृहात, रसिक प्रेक्षकांच्या हाऊसफुल्ल उपस्थितीत रविवार दि. १८ डिसेंबर रोजी सदाशिवराव गोरक्षकर यांना प्रतिष्ठेचा चतुरंग जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम दृष्ट लागण्यासारखा सुंदर झाला. कार्यक्रमाची सुरुवात देवकी पंडित आणि जयतीर्थ मेवुंडी यांच्या सुरेल गायनाने झाली. त्यानंतर 'म्युझियम' या विषयावर संकल्पलेले नृत्यनाट्य सोनिया परचुरे आणि त्यांच्या ४२ विद्यार्थ्यांनी सादर केले. रसिकांना या नृत्यनाट्याने खूप प्रभावित केले. झी २४ तास वाहिनीचे डॉ. उदय निरगुडकर यांच्या हस्ते स्मरणिकारूप गौरवग्रंथाचे प्रकाशन झाले. मुख्य कार्यक्रमात केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते गोरक्षकरांना तीन लाख रुपयांचा धनादेश, देखणे सन्मानचिन्ह आणि मानपत्र देऊन गौरवित करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना गोरक्षकरांनी भावपूर्ण आणि विचारपरिप्लुत भाषण करून कृतज्ञता व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रम अतिशय हृद्य झाला. श्रीधर फडके आणि रवींद्र साठे यांनी सादर केलेल्या सुगम संगीताच्या मैफिलीने या कार्यक्रमाची सांगता झाली. चतुरंगच्या परंपरेप्रमाणे हा कार्यक्रम अतिशय सुनियोजित आणि सुविहित होता.

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाज व पाठारे प्रभु को-ऑप. हा. सोसायटी खार यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १२ फेब्रुवारी, २०१७ रोजी खारच्या पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात दुपारी ३.०० वाजल्यापासून पुढील स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

१) **रांगोळी स्पर्धा** - (वेळ १ तास)
विषय - बदक (१५ वर्षांखालील)
विषय - मोर (१५ वर्षांवरील)
सूचना - खडू, पट्टी, ठिपक्यांचा कागद अथवा कोणतेही चित्र सोबत नसावे

२) **चित्रकला स्पर्धा** - (वेळ ३० मिनिटे)
अ गटः ५ ते ८ वर्षे - विषय - वाढदिवसाचा केक
ब गटः ९ ते १५ वर्षे - विषय - हाताच्या पंजापासून चित्रकला
क गटः १५ वर्षांवरील - विषय - आवडता खाण्याचा पदार्थ
सूचना - कागद पुरविला जाईल. रंग ज्याचे त्यांनी आणावे.

३) **हस्तकला स्पर्धा** - (वेळ ३० मिनिटे)
अ गटः ५ ते ८ वर्षे - विषय - आगपेटीच्या काड्यांपासून घर बनविणे. सूचना- कागद पुरविण्यात येईल.
ब गटः ९ ते १५ वर्षे - विषय - क्रेप पेपरचा नेकलेस बनविणे
क गटः १५ वर्षांवरील - विषय - पुजेची थाळी सजविणे. सूचना- साहित्य ज्याचे त्यांने आणावे.

४) **संगीत स्पर्धा**
अ गटः ५ ते ८ वर्षे - विषय - कविता सादर करणे (पाठांतर आवश्यक)
ब गटः ९ ते १५ वर्षे - विषय - हिंदी चित्रपट गीत
क गटः १५ वर्षांवरील - विषय - मराठी/हिंदी चित्रपट गीत, विषय - पायल/घुंगरु.

५) **फॅन्सी ड्रेस स्पर्धा** - (वेळ ३ मिनिटे)
अ गटः ५ ते ८ वर्षे
ब गटः ९ ते १५ वर्षे
क गटः १५ वर्षांवरील

६) **एकपात्री अभिनय स्पर्धा** - (वेळ ५ मिनिटे)
अ गटः ५ ते ८ वर्षे - विषय - साभिनय गीत सादर करणे
ब गटः ९ ते १५ वर्षे - विषय - गोष्ट सांगणे
क गटः १५ वर्षांवरील - विषय - विनोदी नाटकातील नाट्य प्रवेश.

सर्व ज्ञातीय बंधु-भगिनींनी तसेच बच्चे कंपनीनी बहुसंख्येने स्पर्धांमध्ये सहभागी होऊन स्पर्धा यशस्वी कराव्यात

अधिक माहितीसाठी कृपया चिटणीसांकडे संपर्क साधावा.

सौ. नीता सेंजित ९८२०१६६६२८
श्री. जयंत कीर्तिकर ९८६७९५८५३५

*

युवामंच

## Kiddo!

**-Shaunak Jayakar**

Recently I visited my friends house for complition of some college project work. There I met his young cousin who was five years old.This younger kid named Abhay was a cute little kid with a 3.5 feet height and a fair complexion. And his pink cheeks with a chubby physique made him look even more cute. I met him for the first time and couldn't resist myself from playing with him. So I asked my friend for a break and went in the living room where Abhay was playing his favourite car racing game over the playstation. I went and sat behind him. He looked at me and then again got into his game. Must he be wondering why I sat here besides him out of all the other sofas and chairs.

I said, ``hi."

He looked at me with blank expressions and again got into his game. I understand being a stranger to him. Coming and sitting besides him would have puzzled him though but I was too wanting to play that I started making all sorts of funny faces. Toung out wide with both eyes looking towards the nose in the centre, streching eyes wide to look like Chinese and wagging my tongue, making all sorts of animal noises... all such only to gain his attention. And yes! It did small children do like such kind of funny faces and noises being made. They find it quite amusing. He looked at me and giggled. So I started doing more of that. Then I asked him if I could play with him. With all his kind and generous heart he held me the joystick he was holding and with a cute little smile he said, ``Dada, he ghe khel."

That made my day. I could sense victory and Abhay's cute smile as a trophy of that victory was no less than winning a Wimbaldon title by defeating a worthy opponent taking the game to the last set. I sat down, folding my legs and on those, Abhay sat. And we two were playing all long untill my friend came outside to ask me how long was I going to take the break? I looked at the watch to see. It was already two hours since I was outside playing with Abhay. With a stone heart I told Abhay that, I had to go to finish off my work and that I no longer could play with him. He was upset though, but then when my friend promised him that after the project work gets over, we both would play with him. He was all excited and happy. He told us to quickly complete our work and be back as very soon as possible. Back in the room, while completing the project, I told my friend this all from how strangers to lovable I turned out to be for Abhay. He laughed out his heart and looking at me he said, ``Dude, you're such a kiddo!"

## बालविभाग

### BEST FRIENDS

Best friends are the ones who tell us the simplicity of rice and curd,
They are the ones understand our feelings without we saying a word.
Only they support us in our difficult times,
And calm us down with their own sweet rhymes.
They can walk with us through all the roughs,
Everyone says to break them is very tough.
I wish my best friend should be like this,
Who would always support me and never ever hiss.
One who would miss me a lot ,
Even a day very hot.
The one who would be my best friend,
Who would always care for me and try to defend.
Who will say, "I will be there for you whole life long"
"To hear from you,your good-bad songs"

**- Aarati Jayesh Kothare**

Std. VIII

# जीवन का सफर

**-रंजना तळपदे**

माणूस जन्माला येतो तो एकटाच व शेवटी पण तो एकटाच जातो. हा जगाचा नियम आहे. या दोघांमधला जो काळ असतो त्याला आपण सफर म्हणू, 'जर्नी' म्हणूया किंवा आणखी काहीही. असो.

या मधल्या काळाला आपण जीवन म्हणतो व ते कसे घालवायचे हे व्यक्ती व्यक्तीवर अवलंबून असते. माणूस हा कधीच समाधानी नसतो. सारखी त्याला कसली न कसली हाव असते. म्हणून तो नेहमी म्हणत असतो की दुसरा किती सुखी आहे; पण सुख हे मानण्यात असतं. आपण सतत भूतकाळ व येणाऱ्या काळाचा विचार करत असतो. पण वर्तमानाकडे लक्षच नसते, आणि मग कुरबुर सुरू होते. मी स्वत: एक रिटायर्ड सिंगल वुमन आहे. मला फिरायची खूप आवड आहे. पण हा छंद मी सारखा जोपासू शकत नाही. कारण मी नेहमी ग्रुपसोबत प्रवास करते. हा लेख माझा छोटासा प्रयत्न आहे कारण लिहिण्याच्या माध्यमातून आपण स्वत:ला व्यक्त करू शकतो. मला रिटायर्ड होऊन चार वर्ष झाली व आताच मी पाठारे प्रभू समाजाकडे वळले. मला खात्री आहे की थोडेसे प्रोत्साहन नक्कीच मिळेल. देवाने आपल्याला भरभरून दिले आहे. त्याचा वापर आपण पुरेपूर करायला पाहिजे. सतत आनंदी राहणं हे फार कठीण आहे. पण प्रयत्न करायला काहीच हरकत नाही. 'मेरा नाम जोकर' मधला जोकर किती दु:खी होता! त्याची आई गेली तरीही त्याने आपला 'शो' सोडला नाही. सतत प्रेक्षकांना हसवत राहिला, कारण 'द शो मस्ट गो ऑन' म्हणून मित्र व मैत्रिणींनो; माझे एवढंच मत आहे की सतत आनंदी रहा व आनंद द्या. तरच ही जीवनरूपी नाव आपण पार करू शकू. मला विश्वास आहे की हा माझा छोटासा प्रयत्न फळास येईल. माझी भूतानसफर येथे देत आहे.

# TOUR TO BHUTAN

Journey is my life. It's like tonic/stimulant for my body. I always feel refreshed when I return from any tour irrespective of small / long tour. Recently I had been to Bhutan with a travel company viz. Vihar Travels accompanied by my relatives and friends.

We booked our tour 3 to 4 months in advance i.e. in the month of May 2016. Our tour was from 19$^{th}$ Sept. to 25$^{th}$ Sept. 2016. As the months were passing and our tour date was nearing I was getting excited. I always pre-plan my packing well in advance. I started packing my luggage on 17$^{th}$ Sept. itself. Since I was alone from my house, I carried only one bag because the tour was only for a week.

Our flight was scheduled on 19$^{th}$ early morning but since my relatives / friends were coming from Pune we gathered ourselves at the Mumbai International airport on 18$^{th}$ midnight i.e at 4am so that we could come together comfortably. I reached the airport at 3.30am, after doing the necessary check in we all met at 4am and reached the passenger's lobby. Some of our friends were new to me so we had the introduction session. There was still time for this flight, we had some coffee and snacks and waited for the flight. At last, at 6.45 am we were given the boarding pass and we entered the plane for Mumbai- Delhi. At 9.30am we reached Delhi. Our connecting flight for *Bagdodra* was at 10.30am. On completion of all the formalities we boarded for the flight.

As we were reaching *Bagdodra* the scenery from the plane was mesmerizing. At 12.30 noon we landed at *Bagdodra*. The climate was very hot. Our tour manager received us at the airport and directed eight of us in a van. Remaining passengers were directed in another van. At about 1pm, we started our journey from *Bagdodra* to Bhutan. It was about 6-7hs journey in which we were served lunch and tea on the way. This journey by road was very hectic, but we enjoyed its experience our journey was via beautiful *Siligudi*. At about 8pm we reached our destination Bhutan.

Bhutan being a foreign country we had to pass through the border gate to enter its land. On reaching our hotel at *Phontshilling*, we were allotted our rooms. The room was very spacious and luxurious. Later after some time we were called for the dinner. After dinner we finally rested in our rooms after a long busy day.

Next day we had to go to the immigration office at *Timpu* which every tourist has to undergo. After all the formalities were done, we spent our day shopping in the local markets of Bhutan. The 3$^{rd}$ day we headed to *Paro*, where we visited a huge Buddha statue which can be sighted from every corner of Bhutan. Next day we started with Paro airport view point, Paro Museum and after lunch we visited Kichu Monastery and many others. We also viewed the apple gardens of Bhutan. Next day early morning we headed to *Phontshilling* which was again a 6hr journey. Throughout our Journey we could enjoy the different phases of nature which was an amazing experience.

Bhutan is a very liberal country governed by very kind hearted King, who keeps his citizens satisfied and happy by giving free medical and education facilities. Celebrating their happiness, Natives of Bhutan celebrate "The Happiest Day of the year" on 23$^{rd}$ September and prepare a local delicacy "Porridge". This dish was also served at our dinner.

Our hotel authorities had a warm and a welcoming approach towards us. The performed Native dances and we clicked some pictures in the native dress. The tourist guides were also very informative and helpful. Most importantly, a unique we observed in Bhutan was their King is so humble that he moves openly in public with minimum security unlike India. This shows this country is a safe and calm place to live.

At last, the day arrived when we had to say a final goodbye to this beautiful country. We reached *Phontshilling* in the evening. Next day at 7am we headed to the Bagdodra airport. This journey was via "the paradise" Darjeeling. At 1.30pm we reached the airport, our flight for Delhi was at 3.30pm. On reaching Delhi, we had a connecting flight to Mumbai at 6pm. We reached Mumbai Domestic airport at 9.30pm.

This was an unforgettable tour and I am still mesmerized by the beauty, climate and hospitality of this country and I would definitely recommend everybody to visit this heavenly country at least once. Loved everything about **Bhutan "the land of heavens"**.

*

## पा. प्र. महिला समाज

**१०२वा वार्षिक बक्षीस समारंभ**

रविवार दिनांक १९ फेब्रुवारी, २०१७ रोजी सायंकाळी ५ वाजता खार येथील सांस्कृतिक केंद्र सभागृहात सौ. वीणा विकास मानकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे. या समारंभात श्रीमती रेणुका धुरंधर, डॉ. सौ. ज्योती तळपदे-सोनेजी, सौ. पवित्रा कीर्तिकर, कु. संकिता अजिंक्य, कु. आरती व्यवहारकर, सौ. ईश्वरी जयकर-शाह, सौ. श्रेया तळपदे, कु. तेजा वाझकर, श्रीमती मृदुला आगासकर-जोशी यांना विविध पारितोषिके देऊन गौरविण्यात येईल. सर्वांना हार्दिक निमंत्रण.

*

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



**कथाकली**

# परिस्थिती

**-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर**

*(या वर्षापासून कथांचं हे नवीन सदर सुरू करीत आहोत - संपादक)*

''या ना आत.'' तेजसच्या आईनं दरवाजात उभ्या असलेल्या सुशांतच्या आईचं स्वागत केलं आणि विचारलं - आज इकडे कुठे?

''तेजसकडेच आलेय.''

''काही विशेष?''

''होय हो. हल्ली सुशांत दिवसभर घरीच असतो. रात्री बाहेर जातो. मध्यरात्री कधीतरी घरी येतो. तेजस बरोबरच तो जायला हवा ना? म्हणून विचारायला आले. हल्ली मोटारही येत नाही त्याला पिकअप करायला. कधी कधी पाच तासांच्या आतच परत येतो. काळजी वाटते हो. ह्यांची परिस्थिती तुम्हाला माहीतच आहे. ॲक्सिडंट झाल्यापासून नोकरी सुटली त्यांची. त्यांची काळजी करता करता आता ही नवीनच चिंता लागली नशिबाला...''

''अहो, अशा घाबरू नका. रजा वगैरे घेतली असेल त्यानं.''

''छे हो! नवीन नोकरी आहे त्याची. शिवाय हल्ली अशा रजा मिळत नाहीत. तेजससुद्धा त्याला हाक मारायला येत नाही.'' सुशांतची आई बोलत असतानाच तेजस बाहेर आला. त्याला बघताच तिनं त्याला विचारायला सुरुवात केली-, ''अरे तेजस, तू हल्ली ऑफीसमध्ये जाताना सुशांतला हाक मारायला येत नाहीस? एरव्ही तुम्ही दोघं आमच्या घरापाशीच मोटारीत बसायचात ना?''

''हल्ली तो माझ्याआधीच जायचा. तो लवकर जाऊन ऑफीसच्या जीममध्ये व्यायाम करतो. हल्ली अशी सोय असते. पूर्वी आम्ही एकत्र येत होतो. पण आता नसतो. त्याची शिफ्ट आणि प्रोसेस... म्हणजे सेक्शनसुद्धा आता बदललाय.''

''हल्ली तुम्हाला मोटार येत नाही का न्यायला आणि परतायला''

''असते की! अं... का?... तो मोटारनं येत नाही? तुम्ही त्याला विचारलंत का?''

''विचारलं नं! पण तो हल्ली नीट उत्तर देत नाही. तुला माहीत असेलच, आमची खूप भांडणं होतात. अं एक विचारू? तू तुझ्या पगाराचं काय करतोस?''

तेजसच्या मनात आलं; खरं सांगितलं तरी मी पगाराचा कसा योग्य विनियोग करतो आणि सुशांत कसा करीत नाही त्या मुद्द्यावर त्याच्या घरी भांडण होईल...

आणि खोटं सांगितलं तर माझी आई माझ्यावर रागावेल. तो उघडपणे एवढंच म्हणाला ''मी आई बाबांच्या सल्ल्यानं काय ते करतो.''

''हंऽऽ'' सुशांतची आई सुस्कारा टाकीत म्हणाली - ''सुशांत असं करत नाही. तू सांग नं रे त्याला समजावून. घरखर्चासाठी त्यानं नको का पैसे द्यायला? उगीचच कपड्यांवर, फालतू गोष्टींवर आणि तऱ्हेतऱ्हेच्या परफ्युम्सवर खर्च करीत बसतो.' सुशांतची आई बराच वेळ सुशांतबद्दल तक्रारी मांडत बसली होती.

कधी तेजसची आई तिच्या सुरात सूर मिसळून बोलत होती तर; कधी तिला समजावण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या मनात आलं - काठावरच्या माणसानं पोहताना बुडण्याची शक्यता असलेल्या माणसाला कोरड्या सूचना करून काय उपयोग? पण त्या परिस्थितीत तेजसच्या आईला यापेक्षा वेगळं सहकार्य करणं शक्य नव्हतं... शेवटी सुशांतची आई न राहवून म्हणालीच ''तुम्ही किती नशीबवान आहात हो तजसच्या आई! तुम्हाला तेजससारखा समजूतदार आणि हुषार मुलगा लाभला..''

''सुशांतसुद्धा हुषार आहे हं मावशी' तेजसनं पटकन मित्राची बाजू घेतली.'

'खरंय तुझं म्हणणं तेजस. माझा सुशांत खूप हुशार आहे, पण परिस्थितीनं चिडतो कधी कधी. परिस्थितीच माणसाच्या वागण्याचा वेगवेगळा अविष्कार घडवते...''

परिस्थिती! पुन्हा पुन्हा सगळ्यांच्याच विचारांची गाडी या एकाच शब्दावर नी त्रिकालाबाधीत सत्यावर येऊन आदळते. परिस्थिती ? कधी आर्थिक, कधी सामाजिक तर कधी कधी मानसिक सुद्धा! तेजसच्या मनात विचार येत होते.. ही परिस्थिती निर्माण करणाराही माणूस, या परिस्थितीचा बळी ठरणाराही माणूसच आणि परिस्थितीचा आधार घेत स्वत:च्या वागण्याचं समर्थन करणाराही माणूसच.... परिस्थिती काही माणसांना आपल्या प्रवाहाच्या जोरावर कुठंही, कसंही, कितीही वाहवत नेणारी... काहींना अतिशय समंजस बनवणारी, तिऱ्हाईताच्या नजरेतून फक्त माणसांना जबाबदार ठरवणारी तर काहींच्या मनात जबरदस्त आत्मविश्वास निर्माण करणारी...

परिस्थितीचं आणखी बरंच पृथक्करण तेजसच्या मनानं केलं असतं. पण तेवढ्यात सुशांतची आई बोलू लागली. तिकडे लक्ष देणं त्याला भाग पडलं- ''मला त्याची काळजी वाटते. मध्येच एक महिनाभर सकाळी निघायचा नी संध्याकाळी परतायचा. नी पुन्हा थोड्याच वेळात निघून मध्यरात्री घरी यायचा. आता बघावं तर घरातच असतो. डबा नेणं तर त्यानं कधीच सोडलं. मध्यंतरी आमच्यासाठी भारीतल्या चार साड्या आणि हयांच्यासाठी दोन शर्ट घेऊन आला.''

''मुलांचा जीव असतो हो आईवडिलांवर' तेजसची आई म्हणाली - ''ही तरुण पिढी नं बोलून दाखवत नाही. पण मनातून आईवडिलांची काळजीच करत असतात.''

''आपण काहीच करीत नाही का मुलांसाठी?''

''करता नं! मोजायला गेलं तर तुमच्या प्रेमाचं वजनच जास्त होईल. सुशांतसुद्धा नेहमी हेच बोलतो. तुम्हाला सुखात ठेवायचं म्हणतो नेहमी,'' तेजस म्हणाला, ''तुमचं नेमकं खटकतं कुठं?''

''कदाचित आमचे विचार विरुद्ध दिशेला जातात'' सुशांतची आई उत्तरली.

''किंवा कदाचित आम्ही मुलं आमचं मन, आमचे विचार तुम्हाला नीट उलगडून दाखवू शकत नाही असं असावं...'

''असेलही, पण दुरावा राहतो एवढं मात्र खरं... तुम्ही दोघं मनानं एवढे जवळ कसे?''

''परिस्थितीनं'' तेजसच्या मनानं चटकन उत्तर दिलं. त्या उत्तराचा प्रतिध्वनी त्याच्या आईच्या मनात उमटला आणि सुशांतच्या आईच्या मनानं तो बरोबर टिपला म्हणून ती म्हणाली - ''खरंय रे! परिस्थिती बदलायला हवीच आमची. पण ती बदलण्यासाठी वस्तूंची; तीसुद्धा महागड्या वस्तूंची गरजच काय? हे स्टेटस सिंबॉल्स नसले तर काय बिघडतं?

''तसं नव्हे मावशी... ज्या वस्तू आमच्याकडे नसतात पण मित्रांकडे असतात त्या आम्हाला ताबडतोब हव्या असतात. या रिकाम्या जागा भरल्यानं; की माणसाला पैकीच्या पैकी मार्क्स मिळाल्याचा आनंद होतो. हल्ली स्पर्धा फार वाढलीय. या क्षेत्रातही ती असणारच.''

''मग भले ती जीवघेणी का असेना'' असं म्हणत सुशांतची आई उठली नी म्हणाली ''तुमचा बराच वेळ घेतला. पण कदाचित मला एक नवा दृष्टिकोन मिळाला सुशांतच्या वागण्याकडे बघण्याचा...''

तिच्या जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत तेजसच्या मनात शब्द उमटले 'आता फार उशीर झालाय मावशी' आणि आईला म्हणाला ''सुशांतच्या आईनं हे समजून घ्यायला फार उशीर केला. आणि सुशांतनं आईला पुढे सांगितलं, ''सुशांत भलत्याच मार्गावर गेलाय गं.''

हे ऐकून तेजसच्या आईला धक्काच बसला. त्यातून सावरत ती म्हणाली - 'आयुष्यातले हे मोह असतात ना ते क्लोरोफॉर्मसारखे असतात माणसाला गुंगी आणणारे नी त्या बेहोशीत माणसाच्या हातून ते घडतं ते सामान्यत: पूर्ण शुद्धीवर असणाऱ्यांना अतर्क्य कोटीतलं वाटतं. पण बेहोशीनंतर त्यांना जाग येते तेव्हा बरंच काही घडून गेलेलं असतं, बराच उशीर झालेला असतो. ते जसं सुशांतला धोक्याच्या रस्त्यावरून मागे वळवण्याचा काही उपाय आहे का? आणि असला तर तू तो सुशांतच्या आईला का नाही सांगितलास?''

''आहे. पण तिला तो पटला नसता. कारण दोन पिढ्यांमधलं अंतर...'

''मग तू आणि आम्ही तुझे आईवडील यांच्यात ते का नाही?'

'आईवडिलांचं आर्थिक स्वास्थ्य जे तुमच्याकडे होतं. लहानपणी ना दुसऱ्यांकडे आहेत त्या वस्तू आपल्याकडे का नाहीत एवढाच प्रश्न पडतो. याचं उत्तर नाही समजत. त्या वस्तू फक्त आपल्याच घरात असाव्यात आणि आपले आईबाबाच नंबर वन असावेत असं वाटतं. या विचाराला तडा गेला की निर्माण होतात अनेक गुंड, दुसऱ्या चांगल्या मुलांना वाईट मार्गाकडे वळवणारे आणि त्यांच्याकडे खेचले जातात ते अशा भावनांचे बळी ठरणारे अनेक सुशांत. तुम्ही कधीही मला सगळ्या प्रकारची मदत भावनिकसुद्धा कराल, त्याचा मला विश्वास वाटतो. तोच सुशांतला हवाय त्याच्या आईवडिलांकडून त्यांच्या हिंमतीचा विश्वास. पण त्यानं स्वत:हून त्यांच्यासाठी काही आणायचं म्हणतो, त्यालाही त्याचे आईवडील नकार देतात.''

''कारण परिस्थितीच्या निर्झराच्या प्रवाहातून तो एका काठावर फळं, फुलं फुलवू पाहतोय तर त्याचे आईवडील जगण्यासाठी आवश्यक असं धान्य उगवू पाहतायत. दोघेही बरोबर. सगळंच आवश्यक. कपडे गरजेपुरते कॉटनचे की श्रीमंती गर्भरेशमी? पोट भरण्यासाठी भाकरी. पण केक का नको? गरजा भागवून उरलेल्या पैशात भविष्याची तरतूद की आत्ताची चैन एवढेच प्रश्न आहेत. प्रत्येक धबधब्याचं छोट्या काय किंवा मोठ्या काय; लुटता येणारं दृष्टीसुख सारखंच. फरक फक्त दृष्टीकोनामधला. पण शेवटी प्रत्येकाच्या पायाखालची माती नी अंगणामधलं ऊन वेगळंच मोजमाप घेऊन येतं हेच खरं... आपण नुसती चर्चा करून काय उपयोग?''

असं म्हणत तेजसची आई तिची कामं उरकण्यासाठी आत गेली - तिच्या विश्वात...

आणि तेजससुद्धा स्वत:च्या उद्योगात रमला त्याच्या स्वत:च्या विश्वात...

*

भूतांच्या गोष्टी-भाग ३

# अद्‌भूत गोष्टींचा संग्रह

*काही लोकानी सांगितलेले त्यांचे अनुभव*

-विनय त्रिलोकेकर

**प्रस्तावना**

माझ्या मुलाचा मित्र प्रशांतने मला फोन केला.

''काका, तुमचे ब्लॉग वाचले. 'भूतांच्या गोष्टी' आवडल्या. आमच्या काही अनुभवाबद्दल तुम्हाला सांगतो.''

''हे सारे फोनवर नको. प्रत्यक्षात भेटू.''

''मग कधी येता?''

मी मनात विचार केला, माझ्या लिखाणासाठी आयतेच खाद्य मिळत असताना वेळ कशाला काढा?

''आज संध्याकाळी?''

''चालेल.''

ठरल्याप्रमाणे मी प्रशांतच्या घरी गेलो. दिवाणखान्यात (हॉल) सोफ्यावर प्रशांत आणि त्याचे वडील-गोविंद बसले होते.

''या, बसा. काय घेणार?''

''फक्त थंड पाणी.''

त्यांच्या समोरच्या आरामखुर्चीत मी बसतो न बसतो तोच गोविंदरावानी सुरू केले.

''तुमचे `Encounters with Ghosts' व त्याचे रूपांतर- ˘भूतांच्या गोष्टी' आणि 'The Protector' वाचले. पण तुमचा मूळ लेख आणि तुम्हीच केलेल्या त्याच्या अनुवादामध्ये बराच फरक जाणवतो.''

''हं.'' मी म्हणालो, ''प्रशांत, तुझ्या आईला काहीतरी सांगायचे होते. कोठे आहेत त्या?''

"Hello uncle, how are you and how is aunty?", नीतीने (प्रशांतची बायको) आतून हॉलमध्ये येत विचारले, ''मम्मी किचनमध्ये कामात आहेत. थोड्या वेळात येतील.''

गोविंदराव म्हणाले, ''ती येईल हो, मी काय सांगत होतो?... काय हो तुमचा भूतांवर विश्वास आहे?''

माझ्या उत्तराची वाट न बघता पुढे बोलत राहिले, ''जर देवावर विश्वास तर भूताखेतावर असायलाच हवा... केमिस्ट्रीमध्ये आपण शिकलो नाही का? स्ट्रकचरल फॉरम्युल्यातील 'Mirror Images'- डेक्सट्रो व लेवो रोटेटरी- त्याचप्रमाणे निसर्गातही 'चांगले' आणि 'वाईट' प्रवृत्ती असतात.''

मला कळत नव्हते की हा संवाद नेमका कोणत्या दिशेने जात होता. मी म्हणालो, ''तुमचे चालू द्या."

''माझा ह्या सर्वावर विश्वास आहे. माझा देवगण. आम्हाला भूतं दिसू शकतात; त्यांच्यापासून कसलाच त्रास नसतो. पण सुनीताचा, प्रशांतच्या आईचा पडला माणूसगण- आणि तिच्यासारख्यांना भूतखेतं दिसतात देखील आणि त्रास होऊ शकतो. बघाना, सुनीताचा लंडनमध्ये...''

''अहो, प्रशांतचे बाबा, मी आईंच्या तोंडून तो किस्सा ऐकणे पसंत करीन. माझा आहे राक्षस गण.''

''मग तुम्हाला भूत दिसणारच नाही...''

''दिसण्याचे सोडा, भुतं मला बघून दूर पळतात.''

''काका, मग तुम्ही माझ्याबरोबर चलाच, माझ्या मित्राच्या झपाटलेल्या घरी- तो 'फ्लॅट'अजून विकला जात नाही. That haunted flat simply wouldn't sell!"

''प्रशांत, असे तुझे तोंड मध्येमध्ये घालू नका. माका बोलून दि रे. तुझो आणिक सुनिताचो ते काय ते, माझे बोलून झाल्यावर मागीर ऐकवत्याले.''

मग प्रशांतच्या बाबांनी आपला अनुभव ऐकवला. नंतर मी आईलेकाचे ऐकले.

तेच थोडाफार बदल करून लिहीत आहे.

१.

## 'ग्लॅक्सो' ८३ बसचा बस थांबा

तसे मी आयुष्यात भूत एकदाच बघितले...हो, भूतच होते... नाहीतर काय म्हणाल तिला? एकदाच आलेला हा अनुभव. हे असे झाले:

कामानिमित मी अंधेरीला गेलो होतो. माझे काम उशीराच संपले आणि माझा परतीचा प्रवास सुरू झाला. विरा देसाई रोडवरून मी ऑटोने बेस्टच्या अंधेरी बसस्थानकापर्यंत गेलो. बऱ्याच वेळाने बस क्रमांक ८४ मिळाली. पण काय माझे नशीब? ती होती ग्लॅक्सोपर्यंतच. बराच उशीर झाला असल्याने बसमध्ये फार माणसेही नव्हती. आणि जी काही होती ती मी उतरण्यापूर्वीच निघून गेली होती. मी शेवटी उतरलो. बस परत निघून गेली. मी बस थांब्यावरील पाटी वाचली - ८३, ८४, ९०, ९२... घराकडे जाण्यास भरपूर बसेस होत्या.

बराच म्हणजे बराच उशीर झाला होता. बसथांब्यावर कोणी नव्हते, शिवाय एक महिला आणि मी. ती बाई मी त्या '८४' मधून उतरण्या अगोदरच तेथे उभी होती. मी माझ्या मनगटी घड्याळाकडे बघितले. बापरे, अकरा वाजून गेले! म्हणजे आता भिस्त होती ती फक्त '८३'वर, पण शेवटची ८३ गेली तर नाहीना? मी मनात विचार करीत होतो. 'फ्लोरा फाऊंटन'ची ८३ गेली असणार. पण ऑपेरा हाऊससाठी काही असतीलच, माझे विचार चालूच. माझी चुळबुळ सुरू झाली. ती महिला माझ्यापुढे उभी होती. अचानक ती माझ्या मागे जाऊन उभी राहिली, का कोणास ठाऊक? तिचे असे करण्यामुळे असेल, माझे लक्ष तिच्याकडे वेधले गेले.

तिने पांढरी शुभ्र साडी व पांढरा ब्लाउज घातला होता. हातात पांढऱ्या बांगड्या आणि पायात सफेद सॅन्डल. तिच्याकडे सफेद पर्सही असावी, असे वाटते. तिचा चेहरा? तिने तो संपूर्णपणे आपल्या पदराने झाकला होता. डोक्यावरून घेतलेल्या घुंगटामुळे तिचे केस दिसत नव्हते. मी मागे वळून तिच्या दिशेने पहिले. मला आश्चर्य वाटले. कारण ती विरुद्ध दिशेकडे बघत होती. म्हणजे वरून येणाऱ्या बसकडे नव्हे तर वरळी नाक्याच्या दिशेने. कदाचित् कोणाची वाट बघत असावी, पण ह्या वेळेला? तिची हालचाल- तिचे सारखे-सारखे आपल्या मनगटावरील घड्याळात पाहणे, ह्या पायावरून त्या पायावर जाणे, हातांची बोटे मोडणे, वारंवार कपाळाला हात लावणे... सारे काही हेच दर्शवत होते. मी वळलो आणि बस येते का पाहू लागलो. बसचा पत्ता नव्हता. मला अतिशय शीण आला होता.

रस्त्यात रहदारी नव्हती. अगदी सामसूम- शुकशुकाट. समोरून येणारे एकही वाहन दिसत नव्हते, ना बस ना टॅक्सी.

मी परत त्या बाईकडे वळून विचारले, ''आप बहुत समयसे बसके लिये खडे हो। फाऊंटन या ऑपेरा हॉऊस की ८३ गयी क्या?''

तिने खुणेनेच आपली मान हलवून 'नाही'असे दर्शविले.

''आप किसीकी राह देख रहीओ? बस कब आयेगी?''

ती अजून होती त्याच दिशेला बघत होती. तिने पुन्हा खुणेनेच नाही असे दर्शवले आणि आपली मान तशीच ठेऊन आपल्या हाताच्या खुणेनेच मला पलीकडे पाहण्याचे सुचविले. मी वळून पाहू लागलो. आश्चर्य म्हणजे खरोखर ८३ बस येत असावी. पण न बघता तिला कसे समजले?समोरून दोन दिवे जवळ येताना दिसत होते. हो; ते बसचेच होते. एकदाची बस आली. आणि आली होती 'फ्लोरा फाऊंटन' ८३ ही बस. उडी मारूनच बसमध्ये शिरलो. वाटले तीही माझ्या मागून बसमध्ये चढेल. पण नाही. मी मागे पाहिले. बसस्टॉपवर कोणीही नव्हते. 'टण-टण' बसची घंटा वाजली. बस सुरू झाली.

''साहेब आपण मागे काय बघता?''

''मला वाटले ती बाई माझ्या मागून चढेल.''

''कोणती बाई? बससाठी तेथे तुम्ही सोडून कोणीही उभे नव्हते. गेली पाच रात्र मला हाच अनुभव. ह्या इथे ह्याच गाडीत चढणारे बरेच प्रवासी त्याच बाईबद्दल माझ्याकडे विचारणा करतात. मी कधीच तिला पाहिले नाही. पण एक सांगा साहेब, ती पांढऱ्या साडीत होती का हो? असेच ते सर्व सांगतात. पण बसमध्ये बसलेल्यांना ती कधीच दिसली नाही.''

आता मला सांगा ते भूतच असावे, नाही?

(क्रमशः)

*

## पाठारे प्रभु सोशल समाज

* समाजाचे दिवाळी संमेलन ११ डिसेंबर २०१६ रोजी खार येथील पाठारे प्रभु को. ऑप. हौ. सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात पार पडले. संमेलनाध्यक्ष होते श्री. सुदीप नारायण कोठारे. त्यांच्या समवेत फ्रेंच भाषातज्ञ असणाऱ्या त्यांच्या सौभाग्यवतीही मंचावर होत्या. 'मरीन इंजिनीयर' असणाऱ्या श्री. सुदीप यांचा सुयोग्य परिचय समाजाध्यक्षा स्वाती राणे यांनी करून दिला. हौशी कला मंदिरच्या सहयोगाने झालेल्या कॅरम आणि बेझिक स्पर्धेच्या खासियतीचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. 'नेचर ट्रेल', खेळांच्या स्पर्धा यासारख्या कार्यक्रमांमुळे सोशल समाजाच्या वेगळ्या पाऊलखुणा उमटत आहेत. त्यामुळे आपल्या स्वागतपर भाषणात हा उल्लेख समर्पकच होता. अध्यक्षांना प्रेमभेटवस्तू देऊन सन्मानित केल्यानंतर श्री. सुदीप यांनी आपले मरीन इंजिनीयर म्हणून आलेले अनुभव सांगून मार्गदर्शन केले. आपल्या ज्ञातीतील ते पाचवे मरीन इंजिनीयर. सहा सहा महिने घरापासून दूर राहून मोठ्ठा पगार खिशात येतो. मोठी पगाराची रक्कम दिसते; पण अशा काही अनुभवांना सामोरे जावे लागते; त्याचा त्यांनी स्वानुभव सांगीतला. जवळच्याच्या मृत्यूसमयी हजर राहता न येणे, आपल्याच लहानग्याला पाळण्यात पाहिल्यावर नंतर एकदम चालतानाच पहाणे, समुद्रवादळ उठले असताना दोन दोन दिवस जेवणाखाण्याशिवाय बोटीवर अडकून पडणे... असे अनुभवांचे गाठोडे त्यांनी यावेळी श्रोत्यांसमोर मोकळे केले. मात्र त्यात आनंदाभिमानच होता. आता निवृत्तीचा काळ नातवाच्या सहवासात आणि समाजसेवेत जातोय याचे समाधान त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन सौ. नीता सेंजित यांनी केले; आभार मानले श्री. जयंत

(पान ६ कॉलम २ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### कुर्यात् बटोर्मंगलम

१७-१२-१६ पर्जन्य पवन कीर्तिकर

### नारळ साखर दिला

१३-१२-१६ श्री. ऋषभ जयदीप जयकर, कु. भावना भरत राणे

### नांदा सौख्यभरे

०४-१२-१६ कु. स्वप्ना संतोष धैर्यवान, श्री. राहुल मोहन नायर (आं. ज्ञा.)
१४-१२-१६ कु. संजुक्ता श्रीकांत अजिंक्य, श्री. अंकुर राजीव पर्वतीकर (आं. ज्ञा.)
१८-१२-१६ श्री. उत्कर्ष योगेन्द्र अजिंक्य, कु. श्रेया राजीव वेलकर
१८-१२-१६ श्री. अमेय दीपक नायक, कु. नेहा निरंजन हमंद (आं.ज्ञा.)

### विवाह सुवर्णमहोत्सव

११-१२-१६ श्री. मोहन शामराव जयकर, सुहासिनी गजानन वाझकर
२९-१२-१६ श्री. रामकृष्ण मोरेश्वर तळपदे, ज्योत्स्ना गजानन प्रधान

## प्रभुतरुणास देणगी

✶ श्रीमती मंगला सुहास प्रधान यांचे सासूसासरे आणि श्री. मिलिंद प्रधान यांचे आजीआजोबा कै. श्री. आनंदराव श्रीकृष्ण प्रधान आणि कै. श्रीमती सुनीति आनंदराव प्रधान तसेच मिलिंदचे वडील आणि श्रीमती मंगला यांचे पती कै. श्री. सुहास आनंदराव प्रधान यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्रीमती मंगला सुहास प्रधान आणि श्री. मिलिंद सुहास प्रधान यांजकडून रु. ५०१/-

✶ सौ. उर्मिला उमेश कोठारे यांजकडून त्यांचे पती श्री. उमेश गजानन कोठारे यांच्या ८३व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु. ५०१/-

✶ अरविंद आनंद धराधर यांच्याकडून त्यांचा नातू अर्णव आलोक धराधर याला पार्ले टिळक विद्यालयाच्या प्राथमिक विभागातर्फे सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार मिळाला त्यानिमित्त रु. १०१/-

## पा. प्र. महिला समाज

पाठारे प्रभु महिला समाजाने ८ जानेवारी २०१७ रोजी 'आनंद मेळावा' आयोजित केला. खार येथील पा. प्र. को-ऑप. हौ. सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात हा मेळावा सकाळी १० ते रात्रौ १० या वेळात भरला. या मेळाव्याला प्रमुख अतिथी खासच लाभले होते. आमदार ॲड श्री. आशीष शेलार आणि उपमहापौर श्रीमती अलका केरकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन पार पडले. या मेळाव्याचा सविस्तर वृत्तांत पुढील अंकी - भरल्या पोटी!

(पान ५ कॉलम ४ वरून)

कीर्तिकर यांनी. या कार्यक्रमात देणग्या आल्या; त्याचेही वाचन झाले. अंती अध्यक्षांच्या पत्नींनी, सौ. दीपश्री यांनी ज्ञातीतील किसन कोठारे-यांच्या कर्तृत्वाविषयी उत्स्फूर्तपणे माहिती दिली. कार्यक्रमाच्या या पूर्वार्धानंतर रंगला 'स्वरबंदिश' हा कार्यक्रम. गायक अवधूत रेगे आणि गायिका मानसी फडके यांनी मराठी गाण्यांचा खजिनाच रसिकांसमोर ठेवला लुटण्याकरिता. काही अपवादात्मक अशी हिंदी गाणी होती. उदा. 'मधुबनमे राधिका नाचे रे.' हे गीत रचले शकील बदायुनींनी. चाल दिली नौशादजींनी. त्याला स्वर लाभला महमद रफीसारख्या गायकाचा. म्हणजे धर्माने सगळे मुस्लीम! हिंदू राधेच्या मिथकाला अमर करणारे... अशी कहाण्यांची, विनोदांची, माहितीची पखरण करीत होते कवी प्रसाद कुलकर्णी. त्यांच्या निवेदनामुळे रसिकांची दाद वाढत होती. इतकी की रसिकांत बसलेल्या गायिका क्षमा कोठारेंनी तर 'वन्स मोअर'ची मागणी केली सर्वांच्या वतीने. श्रवणसोहळा त्यामुळेच रंगत गेला. दिवाळीसण काय; आपण करू तेव्हा साजरा करता येतो. पा. प्र. सोशल समाजाने तो डिसेंबरात साजरा केला अन् समस्त श्रोत्यांच्या मनात आनंदाचे दीप उजळले. समाजाला दिवाळीच्या अन् पुढील उजळत जाणाऱ्या कार्यक्रमांसाठी शुभेच्छा!

✶ समाजातर्फे रविवार दिनांक, ४ डिसेंबर २०१६ रोजी बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात, शिलोंडा येथे 'नेचर ट्रेलचे' आयोजन करण्यात आले होते. सोशल समाजाच्या इतिहासात प्रथमच राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला ज्ञातीतील निसर्गप्रेमी व हौशी छायाचित्रकारांचा चांगला प्रतिसाद लाभला.

निसर्गभ्रमंती करण्याकरिता रविवारी सकाळी ७.३० वाजताची वेळ निश्चित करण्यात आली होती. सर्व ज्ञातीय वेळेवर राष्ट्रीय उद्यानाच्या गेटवर हजर झाले. समाजाच्या संयुक्त चिटणीस सौ. नीता सेंजित, कार्यकारी सभासद श्री. तुषार कीर्तिकर, आणि श्री. राहुल आगासकर यांच्या समवेत ११ ज्ञातीयांचा हा ग्रुप पायी शिलोंडाच्या दिशेने निघाला. सकाळची कोवळी उन्हे अंगावर झेलीत, स्वच्छ हवेचा आनंद घेत, सभोवतालचा निसर्ग न्याहाळत जाताना वाटेत अचानक हरणांचा कळप दिसला. निसर्ग आपल्या कॅमेऱ्यात बंदिस्त करत चाललेल्या आपल्या पाठारे प्रभु फोटोग्राफर्सना ही एक पर्वणीच होती.

शिलोंडाच्या गेटपासून आत जंगलामध्ये जाण्याकरिता समाजातर्फे वाटाड्याची सोय करण्यात आली होती. या वाटाड्याला सोबत घेऊन मग सर्वजण छोट्याशा पायवाटेवरून जंगलात निघाले. बांबुच्या घनदाट झाडीतून वाट काढत विविध वृक्ष, फुले, वनस्पती, सुंदर रंगीबेरंगी फुलपाखरे पाहत सर्व एका सुंदर झऱ्याजवळ पोहोचले. बिबट्यांचा वावर असल्याकारणाने हा झरा पार करून पुढे जाण्यास मनाई होती. चालल्यामुळे आलेला थकवा घालवण्यासाठी मग सर्वजण झऱ्याजवळील खडकांवर विसावले. ग्रुप फोटोसेशन्स झाले. नंतर श्री. राहुल आगासकर यांच्यातर्फे सर्वांना देण्यात आलेल्या न्युट्रीबार चॉकलेट्सचा आस्वाद घेत नव्या उत्साहात सर्वजण परतीच्या प्रवासाला चालत निघाले.

नेचर ट्रेलनंतर राष्ट्रीय उद्यानाच्या आवारातच एका कॅफेटेरियामध्ये समाजातर्फे सर्वांसाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. गरमागरम उपमा, बटाटावडे व चहा कॉफीचा आस्वाद घेत या ट्रेलचे समापन झाले. ट्रेलमध्ये सहभागी झालेल्या सर्वांनी समाजातर्फे आयोजित केलेल्या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले व पुन्हा अशा ट्रेल्स आयोजित केल्यास त्यामध्ये सहभागी होण्याचे आश्वासन दिले. निसर्गप्रेमी ज्ञातीयांचे असेच प्रोत्साहन व पाठिंबा लाभला तर पाठारे प्रभु सोशल समाजातर्फे लवकरच पुन्हा अशा ॲडवेन्चर ट्रेल्सचे आयोजन करण्यात येईल.

✶ दरवर्षी आपल्या ज्ञातीतील एसएससी व तत्सम आणि त्यापुढील परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक पुरस्कार दिले जातात. २८ मार्च, २०१७ रोजी गुढीपाडव्याच्या वर्धापनदिनी हे पुरस्कार दिले जातील. ३१ जानेवारी २०१७ पर्यंत श्री. जयंत कीर्तिकर आणि सौ. नीता सेंजित या सं. चिटणीसांकडे गुणपत्रक किंवा उत्तीर्णतेचा दाखला विद्यार्थ्यांनी पाठवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

जयंत कीर्तिकर ९८६७९५८५३५
नीता सेंजित ९८२०१६६६२८

## परीक्षेतील सुयश

**पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन बँकिंग, इन्व्हेस्टमेंट अँड इन्शुरन्स** (PGDBII)
श्री. निषाद मिलिंद सेंजित

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67